# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**बुलढाणा जिल्हयातील ८० टक्के महिलांना "ॲनिमिया" आजार झाल्याबाबत**

**(१) ७८९५ (०७-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील ८० टक्के महिलांना "ॲनिमिया" आजार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा आजार कशामुळे झाल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, सदर आजारावर मात करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत,

(४) असल्यास, त्यांची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

आरोग्य विभागामार्फत गरोदर स्त्रियांची हिमोग्लोबीनची तपासणी केली जाते. यामध्ये डिसेंबर, २०१५ अखेर ६७ टक्के स्त्रियांना ॲनॅमिया आजार असल्याचे निदर्शनास आले.

(२) ॲनिमिया (रक्तक्षय) हा आजार प्रामुख्याने संतुलित आहाराच्या अभावामुळे, ज्यामुळे जीवनसत्वे, सुक्ष्म पोषण तत्वे यांचा अभाव असणे ह्यामुळे रक्तक्षय होतो. तसेच जंतविकार हे दुसरे महत्वाचे कारण होय. शरीरातील रक्तातील लोहाच्या कमतरतेने "ॲनिमिया" झाल्याचे दिसून येते.

(३) राज्यामध्ये किशोरवयीन मुलामुलींना दर आठवडयाला एक आयर्न फोलिक ॲसिडची गोळी देण्यात येते. तसेच सर्व गरोदर मातांना गरोदरपणात आयर्न फॉलिक ॲसिड उपचारात्मक व प्रतिबंधात्मक देण्यात येतात व जंतनाशक गोळ्या देण्यात येतात. तसेच तीव्र रक्तक्षय असणाऱ्या मातांना शिरेव्दारे आयर्न सुक्रोज सुध्दा दिले जाते. आवश्यकतेनुसार ब्लड ट्रांसफ्यूजन (रक्त संक्रमण) देण्यात येते.

रक्तक्षय कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नॅशनल आयर्न प्लस इनिशिएटीव्ह कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये लोह व फॉलिक ॲसिडयुक्त औषध व गोळ्या ६ महिने ते ४९ वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुलींना व महिलांना देण्यात येत आहे. तसेच दर ६ महिन्यातून एकदा ॲल्बॅन्डॅझोल हे जंतनाशक औषध देण्यात येते.

माहे डिसेंबर, २०१५ अखेर २९७१६ गरोदर मातांना आयएफए १०० गोळ्या व १६०५२ गरोदर मातांना आयएफए २०० गोळ्या देण्यात आल्या आहेत.

(४) वरील कार्यक्रमांची अंमलबजावणी नियमित स्वरुपात करण्यात येत आहे.

---

## डागा स्मृती शासकीय रुग्णालयात (जि.नागपूर) सिकलसेल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या आराखड्याच्या प्रस्तावास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ३२५२७ (२०-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डागा स्मृती रूग्णालय (जि.नागपूर) करीता सन २०१५-१६ या वर्षाकरीता सिकलसेल कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात येणा-या बांधकाम व दुरुस्ती, अतिरिक्त मुनष्यबळ, सी. व्ही. एस डायगोनोस्टीक सेंटर इत्यादी करिता निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी वैद्यकीय अधिक्षक, डागा, स्मृती शासकीय रूग्णालय, नागपूर यांनी जिल्हयाचे मा. पालकमंत्री यांना पत्र क्र. / डारूगा/ आस्था / बांधकाम / ८२० / २०१५ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षिका, डागा स्मृती शासकीय रुग्णालय, नागपूर यांचेकडून सिकलसेल गर्भजल परिक्षण केंद्र सुरु करणेबाबतचा प्रस्ताव राज्य आरोग्य सोसायटीकडे दि.१४/०९/२०१३ व दि.१९/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. सन २०१५-१६ करिताच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात डागा स्मृती शासकीय स्त्री व बाल रुग्णालय येथे गर्भजल परिक्षण केंद्र सुरु करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी मिळालेली असून सदर केंद्राकरिता रु.५७ लक्ष अनुदान प्राप्त झाले असून आवश्यक इमारत दुरुस्तीचे काम सुरु आहे. तसेच गर्भजल तपासणीसाठी लागणा-या साधन सामुग्रीची खरेदी प्रक्रिया राज्यस्तरावरुन निविदा प्रक्रियेव्दारे सुरु करण्यात आलेली आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांच्या दि.१३/०४/२०१७ रोजीच्या पत्रानुसार उद्योग व ऊर्जा व कामगार विभाग यांच्या शासन निर्णय दि. ०१/१२/२०१६ च्या मुद्दा क्र.४.१ नुसार रु ३.०० लक्ष पर्यंतची खरेदी दरपत्रक मागवून करता येणे शक्य असल्याचे कळविल्यानुसार सदर गर्भजल परिक्षण केंद्रकरिता आवश्यक असलेली रु. ३.०० लक्ष पर्यंतची खरेदी दरपत्रक मागवून करणेबाबत दि. ०१/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अधिक्षिका, डागा स्मृति शासकीय स्त्री व बाल रुग्णालय, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.
(३) डागा स्मृती शासकीय स्त्री व बाल रुग्णालय, नागपूर येथे गर्भजल परिक्षण तपासणी केंद्राकरिता आवश्यक इमारत दुरुस्तीचे काम सुरु आहे. तसेच CVS केंद्राकरिता लागणा-या साधन सामुग्री खरेदी प्रक्रिया राज्यस्तरावरुन निविदा प्रक्रियेव्दारे सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे रुग्णांचे अनुदान**
**६ महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ३५२६६ (२१-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे जळगांव जिल्हयातील रुग्णांचे गेल्या ६ महिन्यापासूनचे अनुदान प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरचे अनुदान प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, हे अनुदान तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाला केंद्र शासनाकडून उपलब्ध करण्यात आलेला निधी विहित मुदतीमध्ये खर्च करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत**

**(४) ४०८७५ (१०-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून सन २०१४-२०१५ मध्ये उपलब्ध झालेला निधी राष्ट्रीय आरोग्य मिशन (एम.एच.एम) मार्फत वेळेअभावी आरोग्य विभागाकडे विहित मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे बहुतांशी निधी केंद्र शासनाकडे परत पाठविण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर झालेला निधी राष्ट्रीय आरोग्य मिशन कडे पाठविल्यानंतर सदर निधी आरोग्य विभागाला खर्च करण्यासाठी उपलब्ध करण्यात येतो, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य मिशन विभागाकडे सन २०१४-१५ मध्ये सर्व्हे एज्युकेशन अँनड टीटमेंट कार्यक्रमा अंतर्गत सेवाभावी संस्थांना किती निधी उपलब्ध झाला किती निधी खर्च करण्यात आला व किती निधी केंद्र शासनाकडे परत करण्यात आला

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तातडीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

राज्यात कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमासाठी केंद्रशासनाकडून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी केंद्रशासन पुरस्कृत एन.जी.ओ. स्किमसाठी रु.५५.०० लाख निधीला केंद्रशासनाकडून मंजूरी मिळाली होती, परंतू प्रत्यक्ष रक्कम कुष्ठरोग सोसायटीकडे उपलब्ध झाली नव्हती. त्यामुळे निधी परत पाठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सर्व्हे एज्युकेशन आणि ट्रिटमेंट हा कार्यक्रम सन २०१४-१५ पासून बंद होऊन त्या ऐवजी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत एन.जी.ओ स्कीम्स ही योजना सुरु करण्यात आली. एन.जी.ओ स्कीमसाठी वर्ष २०१४-१५ मध्ये रु ५५.०० लाख मंजूर करण्यात आलेला निधी हा या योजना अंतर्गत कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांना एन. एच. एम कार्यालयाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर हा मंजूर निधी कर्ज स्वरुपात प्राप्त होणार होता. परंतू सन २०१४-२०१५ ह्या आर्थिक वर्षामध्ये एन.एच.एम कार्यालयाऐवजी केंद्रशासनाला प्रस्ताव सादर करण्यात आला. केंद्र शासनाने या स्किम अंतर्गत कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांना मंजूरी न दिल्यामुळे निधी खर्च करण्यात आला नाही. त्यामुळे निधी केंद्र शासनाकडे परत जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील संग्रहक तलावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) ४२२२२ (२९-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील संग्रहक तलावाचे काम सुरु करण्यासाठी शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देऊन नीधी उपलब्ध करुन द्यावा यासाठी मा. मुख्यमंत्री यांना मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्र दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्रावर निर्णय घेऊन सदर तलावात प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१४-०९-२०१७) :**(१) होय.

(२) मौजे वैरागड, ता. चिखली, जि.बुलढाणा येथील साठवण तलावाची साठवण क्षमता १.५० MM३ पेक्षा जास्त असल्याने या प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधीकरण (MWRRA) यांची मान्यता घेणेबाबत मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे यांना दिनांक ०९/०८/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. या प्राधीकरणाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील झोनल ट्रान्सप्लांट को ऑर्डीनेशन कमिटीकडे झेडटीसीसी मूत्रपिंड किडनी प्रत्यारोपणासाठी ससून रुग्णालयामध्ये दोनशे रुग्ण प्रतीक्षा यादीवर असल्याबाबत**

**(६) ४२४८५ (०३-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील झोनल ट्रान्सप्लांट को ऑर्डीनेशन कमिटीकडे झेडटीसीसी मूत्रपिंड किडनी प्रत्यारोपणासाठी ससून रुग्णालयामध्ये दोनशे रुग्ण प्रतीक्षा यादीवर असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत्यूनंतर अवयव दान करण्यासाठी समाजप्रबोधन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२3-०९-२०१७) :**(१) पुणे येथील झोनल ट्रान्सप्लांट को. ऑर्डीनेशन कमिटी (झेडटीसीसी) ही स्वयंसेवी संस्था असून, ती सर्व पश्चिम महाराष्ट्रातील रुग्णांची प्रतिक्षा यादी बनविते. झेड.टी.सी.सी. च्या प्रतिक्षा यादीवर २५० रुग्णांनी मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी नोंदणी केली आहे.

(२) मृत्यूनंतर अवयवदान करण्यासाठी समाजप्रबोधन करण्याबाबत झेडटीसीसी च्या माध्यमातून तसेच रुग्णालयामार्फत पोस्टर, पत्रके तसेच बाहयरुग्ण विभागात समुपदेशन केले जाते.

शासनाने महाराष्ट्र अवयवदान अभियान दि. ३०.०८.२०१६ ते ०१.०९.२०१६ कालावधीत राबविले व जनजागृती केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शुन्य ते एक वर्ष वयाच्या अर्भकांच्या मृत्यूमध्ये महाराष्ट्रातील १३ तालुक्याच्या अर्भक मृत्यूदर हा भारताच्या अर्भक मृत्यूदरापेक्षाही अधिक असल्याचा अहवाल**

**(७) ४६६५७ (११-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शुन्य ते एक वर्ष वयाच्या अर्भकांच्या मृत्यूमध्ये महाराष्ट्रातील १३ तालुक्याच्या अर्भक मृत्यूदर हा भारताच्या अर्भक मृत्यूदरापेक्षाही अधिक असल्याचे शासनाच्या सार्वजनिक आरोग्य मिशनच्या अहवालात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १३ तालुके कोणते व या तालुक्यामध्ये कोणत्या विशेष उपाययोजना करण्याचे शासनाने योजिले आहे वा योजणार आहे,

(३) असल्यास, त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या, आरोग्य व्यवस्थापन माहिती पद्धती (DHS IMR) च्या माहे जानेवारी २०१६ च्या अहवालानुसार ११ तालुक्यांचा अर्भक मृत्यूदर देशाच्या अर्भक मृत्यूदरापेक्षा अधिक आहे

(२) सदर तालुके मारेगाव जि.यवतमाळ, आंबेजोगाई व धारुर जि.बीड, ठाणे जि.ठाणे, चंद्रपूर जि.चंद्रपूर, गडचिरोली जि.गडचिरोली; भिवापूर, जिल्हा नागपूर; जळगाव जि.जळगाव; नाशिक व सटाणा जिल्हा नाशिक, मालवण, जिल्हा सिधुंदूर्ग हे आहेत.

(३) सदर तालुक्यामध्ये अर्भक मृत्यू कमी करणेसाठी पूढील उपाययोजना राबविल्या जातात-

(१) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम:-

१) मोफत औषधे व इतर साहित्य पुरवठा,
२) मोफत संदर्भ सेवा
३) मोफत निदान

४) प्रसूती झालेल्या मातेस मोफत आहार

५) मोफत रक्तसंक्रमण

(२) जंतनाशक व जिवनसत्व “अ” मोहिम (De-worming & Vitamin “A” Drive):-

(३) लसीकरण:-

(१) बालमृत्यू व बालकांमधील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांचे योग्य वयात संपूर्ण लसीकरण करणे ही अत्यंत सोपी, कमी खर्चाची पण अत्यंत प्रभावी अशी उपाययोजना आहे.

(२) बालकांमधील क्षयरोग, घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, हिमोफीलस इन्फलुएन्झा टाईप बी, पोलिओ, गोवर व कावीळ या आजारांमुळे होणारे आजारपण व मृत्यू कमी करणे हे नियमित लसीकरण कार्यक्रमाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

(३) सदर कार्यक्रमांतर्गत बीसीजी लस क्षयरोगाकरीता, डीपीटी लस ही घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला या आजारांकरिता, पोलिओ लस पोलिओ आजाराकरिता गोवर लस गोवर आजाराकरिता, हिपॅटायटिस बी लस काविळ आजाराकरिता व पेंटाव्हॅलंट लस ही घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, हिमोफीलस इन्फलुएन्झा टाईप बी, व कावीळ या आजारांकरिता प्रतिबंधात्मक साधन म्हणून उपयोगात आणल्या जातात.

(४) बाल उपचार केंद्र (Child Treatment Centres-NRC):-

(५) पोषण पुनवर्सन केंद्रे (Nutrition Rehabilitation Centres-NRC):-

आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (Special New Born Care Unit) (SNCU):-

(६) नवजात अर्भकाची घरच्या घरी काळजी (Home Based Neonatal Care) :-

(७) मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत बाल रोग तज्ञा मार्फत तपासणी :-

१) मानव विकास कार्यक्रमांतर्गत आरोग्य शिबीरे प्राथमिक आरोग्य केंद्र, नगरपालीका क्षेत्रात आयोजीत केली जातात.

२) या शिबिरांमध्ये स्त्रीरोग तज्ञांकडुन गर्भवती महिलांची व स्तनदा मातंची आरोग्य तपासणी व औषधोपचार केला जातो. तसेच बालरोग तज्ञांकडून ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची व ६ महिने ते २ वर्ष वयोगटातील बालकांची तपासणी व औषधोपचार केला जातो.

३) किशोरवयीन मुलींना पोगंडावस्थेतील आरोग्य व जीवन कौशल्ये विकसित करण्याबाबत आरोग्य शिक्षण देणे.

(८) बालमृत्यू अन्वेषण (Child Death Audit- CDA):-

राज्यात होणा-या अर्भक व बालमृत्यूंचे अन्वेषण वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र यांचेमार्फत करण्यात येते.

---

**शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील उप जिल्हा रुग्णालयाच्या समस्यांबाबत**

**(८) ४८३३३ (११-०५-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून त्यास उपजिल्हा रुग्णालयाच्या दर्जा देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत काय, त्यानुसार, ती भरण्यात आली आहेत काय,
(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयाच्या स्वतंत्र इमारतीच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पदनिर्मितीबाबत कार्यवाही सादर करण्यात येईल.
(३) सदर उपजिल्हा रुग्णलायाचे पाया भरणीचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील मंजूरी मिळालेल्या महिला व बाल रुग्णालयाला जागा उपलब्ध नसल्याबाबत

**(९) ५५२९६ (३०-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील शासकीय जिल्हा महिला व बाल रुग्णालयाला मान्यता मिळून तीन वर्षाचा कालावधी लोटला असला तरी अदयाप सदरील रुग्णालयाच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा रुग्णालयावर पडणारा ताण लक्षात घेता सदरील महिला व बाल रुग्णालय लवकरात लवकर कार्यान्वीत झाल्यास नागरिकांच्या सोईचे होणार असतांना अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे त्या रुग्णालयास मंजूरी मिळून तीन वर्षाचा कालावधी लोटून देखील जागा उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

औरंगाबाद येथे २०० खाटांचे महिला व नवजात शिशू रुग्णालय स्थापन करण्यास २०१३ मध्ये मंजूरी देण्यात आलेली आहे. तद्नंतर पासूनच सदर रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात आले असून अद्यापही जागा मिळालेली नाही.

(२) व (३) औरंगाबाद येथील उच्च रुग्णालयाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, कृषी विभाग, सहकार विभाग, महानगरपालिका, सिडको, दूग्ध विकास विभाग इत्यादी विभागांकडे जागा उपलब्धतेच्या दृष्टीने गेल्या तीन वर्षापासून सतत प्रयत्न करण्यात येत आहेत. या विषयाच्या अनुषंगाने अगदी अलीकडेच दि.४.१०.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड यांच्या सोबत चर्चा झाली. वक्फ बोर्डाच्या अधिनस्त असलेली नक्षत्रवाडी, औरंगाबाद येथील सर्व्हे नं.६५ मधील ९ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत वरील चर्चेत त्यांना विनंती करण्यात आलेली आहे. सदर जागा उपलब्ध होताच महिला व नवजात शिशू रुग्णालयाच्या बांधाकामाची कार्यवाही तातडीने करण्यात येईल.
(४) शासनातर्फे उक्त रुग्णालयाकरिता जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत सातत्याने प्रयत्न करुन सुध्दा अद्यापही जागा उपलब्ध होऊ न शकल्याने औरंगाबाद येथील वरील रुग्णालय स्थापन करण्याबाबत विलंब होत आहे.

---

**राज्यात सन २०१३ ते २०१५ दरम्यान सर्वाधिक सिकलसेलग्रस्त रुग्ण विदर्भात असतानाही मुंबईच्या तुलनेत सर्वात कमी निधी वितरीत करण्यात आल्याबाबत**

**(१०) ५७८६१ (३०-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१३ ते २०१५ दरम्यान सर्वाधिक सिकलसेलग्रस्त रुग्ण विदर्भात असतानाही मुंबईच्या तुलनेत सर्वात कमी निधी वितरीत करण्यात आल्याबाबतची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत शहरातील एका सिकलसेलग्रस्त रुग्णांवर सन २०१३ ते २०१५ या वर्षात १.७३ लक्ष रुपयाचा निधी वितरीत करण्यात आला तर विदर्भात नागपूर शहरातील एका रुग्णावर मात्र २७९५ रुपयाचा निधी खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहीतीच्या अधिकारांतर्गत मिळालेल्या माहीतीनुसार नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडीकल) मध्ये सन २०१३ ते २०१५ या दरम्यान २२३६ रुग्ण भरती झाले असून त्यांचा प्रति रुग्ण खर्च मात्र २७९५ रुपये देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाकडून शहरातील रुग्णांचा संख्येनुसार निधी न देता शहरानुसार निधी वितरीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबई शहराच्या तुलनेत नागपूरात निधी वितरणामध्ये झालेला अन्याय दुर करण्याकरिता कोणत्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

राज्यातील २१ जिल्ह्यात सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमास केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होते. या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना समान अनुदान (प्रत्येकी रु. ८ लक्ष प्रती वर्ष) वितरीत

करण्यात येते. सदरचे अनुदान औषधे, प्रयोगशाळा साहित्य व प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे मानधन इत्यादीसाठी उपयोगात आणले जाते. तसेच, सदर वैद्यकीय महाविद्यालयात संदर्भीय सेवांकरीता, आजाराचे निश्चित निदान करण्यासाठी जिल्हे जोडण्यात आलेले आहेत. तथापि, या महाविद्यालयांना जोडण्यात आलेल्या जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील रुग्णांना देखील सेवा देण्यात येतात.

ग्रांट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांना ठाणे, पालघर व रायगड हे जिल्हे जोडण्यात आले आहेत. तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना अमरावती, गोंदिया, गडचिरोली, नागपूर हे जिल्हे जोडण्यात आले आहेत. सन २०१३ ते सन २०१५ दरम्यान निश्चित निदान करण्यात आलेल्या सिकलसेल रुग्णांची संख्या

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | निश्चित निदानाकरीता करण्यात आलेल्या HPCL चाचण्या | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| १ | ग्रांट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | ११८९ | ११६१ | ७२७ |
| २ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | ७८७ | १८६८ | ८७२ |

(२) हे खरे नाही.

सन २०१३ ते सन २०१५ दरम्यान सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ग्रांट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना प्रत्येकी रु. ८ लक्ष प्रती वर्ष याप्रमाणे रु. १६ लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तथापि, सन २०१६-१७ पासून रुग्ण संख्येनुसार अनुदान वितरणाची तजवीज करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सन २०१६-१७ पासून रुग्ण संख्येनुसार अनुदान वितरणाची तजवीज करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सन २०१६-१७ पासून रुग्ण संख्येनुसार अनुदान वितरणाची तजवीज करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) उपजिल्हा रुग्णालयाच्या आराखडयाबाबत

**(११) ५८४१२ (३०-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) उपजिल्हा रुग्णालय १०० कोटींचे मंजूर असूनही यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन व आराखडा तयार करुन दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रुग्णालयाचा आराखडा तातडीने तयार करण्याकरिता शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०९-२०१७)** :(१) अंशतः खरे आहे.

कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयास रु.१०० कोटीची प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली नाही. कोडोली येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आवश्यक असलेल्या जागेअभावी सदर बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे अद्याप तयार नाहीत.
(२) सध्या कार्यरत असलेल्या ५० खाटांच्या रुग्णालयाच्या उपलब्ध जागेवर श्रेणीवर्धीत १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गांगनेर (ता.मौदा, जि.नागपूर) येथे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सन २०१६-१७ अंतर्गत आरोग्य उपकेंद्राकरिता निधी देण्याबाबत

**(१२) ५८९२६ (३०-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गांगनेर (ता.मौदा, जि.नागपूर) येथे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सन २०१६-१७ अंतर्गत आरोग्य उपकेंद्राकरिता निधी देण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७)** :(१) हे खरे आहे.

सदर आरोग्य उपकेंद्राकरिता पुरवणी निधी मंजूर करण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे कडून दि. २९/०६/२०१६ रोजी प्राप्त झाले.
(२) सदर कामात सन २०१५-१६ च्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यानुसार रु.१५.०० लक्ष निधी या कार्यालयाचे पत्र जा क्र.राआसो/पासुविक/३८३४७-३५२/१५ दि.१६/०९/२०१५ अन्वये जिल्ह्यास वितरीत करण्यात आला आहे. तसेच या कामाचा उर्वरित निधी रु.४५.०० लक्ष या कार्यालयाचे पत्र जा.क्र./राआसो/पासुविक/२९९२३-२८/१६ दि.३०/०७/२०१६ अन्वये नागपूर जिल्ह्यास वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ६२ डॉक्टरांनी गर्भलिंग चाचणी करून पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत**

**(१३) ६५०१२ (१३-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गर्भलिंग चाचणी हा कायद्याने गुन्हा असताना सुद्धा राज्यातील तब्बल ६२ डॉक्टरांनी गर्भलिंग चाचणी करून पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन केल्याची बाब दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने त्यांचेवर कडक कारवाई करण्याबाबतचा नोटीसा ही जारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने सदर वैद्यकीय व्यवसायीकांच्या नोंदणीचे निलंबन केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील डॉक्टरांना जाहिरातीचा हक्क देणेबाबत**

**(१४) ६५०४६ (१३-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डॉक्टरांना त्यांच्या व्यवसायाची व त्यांच्या कौशल्यासंबंधी जाहिरात करण्यावर कायद्याने बंदी असून जाहिरात केलेल्या डॉक्टरांबाबत तक्रार आल्यास महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (एमएमसी) १९५६ च्या कायद्यानुसार त्यावर कारवाई करते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांना आपल्या कौशल्याची प्रसिद्धी करता यावी यासाठी डॉक्टरांच्या संघटनेकडून जाहिरात करण्यासाठीची मागणी होत असल्याचे दिनांक २० जून २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जाहिरात हक्क मिळावा यासाठी डॉक्टर न्यायालयातही जाण्याच्या तयारीत आहेत, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१७) :**(१) अशा आशयाच्या जाहिरातीबाबतच्या एकूण १२७ तक्रारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांस प्राप्त झाल्या होत्या. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ कलम २२ महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम-१९६७ नियम ६२ ते ७५ नुसार रितसर चौकशी करण्यात येऊन (Indian Medical Council (Professional Conduct, Etiquette and Ethics) Regulation २००२ मधील कलम ६.१ चा भंग करुन दोषी आढळलेल्या एकूण ८९ नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांना परिषदेने ताकीद देणारे पत्र दिले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील येथील आर्युवेदाचार्य बालाजी तांबे यांच्या वैद्यविशारद पदवीची तपासणी करणेबाबत**

**(१५) ६५२०५ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील आर्युवेदाचार्य बालाजी तांबे यांच्या वैद्यविशारद पदवीची राज्यसरकारने सत्यता पडताळणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंदी साहित्य संम्मेलन उत्तरप्रदेश यांनी सन १९६५ मध्ये प्रयाग येथे बालाजी तांबे यांना वैद्यविशारद पदवी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमसीआयएमकडे सन १९८७ मध्ये व्यवसायाकरीता बालाजी तांबे यांनी नोंदणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन १९९१ पासून बालाजी तांबे अवैद्यरित्या डॉक्टर म्हणुन सेवा करीता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बालाजी तांबे यांची चौकशी करून शासनाने कोणती कारवाई केली,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) नाही, हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात कारंजा लाड ग्रामीण रुग्णालय वगळता वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय अधिकारी मिळूण एकूण २९ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१६) ६८३३२ (२७-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात कारंजा लाड ग्रामीण रुग्णालय वगळता वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय अधिकारी मिळूण एकूण २९ पदे रिक्त असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

वाशिम जिल्हयात कारंजा लाड ग्रामीण रुग्णालय वगळता महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे-६६०० आणि ग्रेड पे-५४००) मध्ये एकूण ७१ पदे मंजूर असून, त्यापैकी ४६ पदे भरलेली व २५ पदे रिक्त आहेत.
(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (ग्रेड पे-६६००) मधील रिक्त पदे पदोन्नती / नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे-५४००) मधील नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत मुलाखतीद्वारे भरण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्हयात तब्बल २६ बोगस डॉक्टर काम करत असल्याची तक्रार

**(१७) ७१८५४ (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयात तब्बल २६ बोगस डॉक्टर काम करत असल्याची तक्रार आरोग्य विभागाकडे करण्यात आली होती व त्यानुसार त्यापैकी अवघ्या ३ बोगस डॉक्टरांना शोधण्यात यश आले असून उर्वरित २३ जणांचा काहीच शोध लागला नसल्याचे माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू २३ बोगस डॉक्टरांना अद्याप पर्यत शोधुन अटक न करण्याची कारणे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन कोणती कारवाई करीत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.

माहे डिसेंबर २०१६ अखेर तालुका आरोग्य कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार जिल्हयात २६ बोगस डॉक्टर आढळून आलेले होते. त्यापैकी ५ बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरुध्द संबंधित पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हे दाखल करणेत आले आहेत. तसेच एकूण १६ बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर तालुकास्तरीय समितीने वेळोवेळी भेट दिली असता, जागेवर भेटले नाहीत. व सद्यस्थितीत त्यांचा व्यवसाय सुरु नसल्याचे निदर्शनास आले आहे. एकूण ५ वैद्यकीय व्यावसायिक हे मा. उच्च न्यायालयाकडील याचिका क्र. १४४७/२०१६ मधील आदेशान्वये इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमिओपॅथी व्यवसाय करत असल्यामुळे त्यांचे विरुध्द सद्यस्थितीत कारवाई करण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाने दत्तक विधान प्रक्रिया ऑनलाईन करून त्यातील सामाजिक संस्थांचा सहभाग काढून टाकल्याबाबत**

**(१८) ७२०४१ (२७-०१-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने दत्तक विधान प्रक्रिया ऑनलाईन करून त्यातील सामाजिक संस्थांचा सहभाग काढून टाकल्याने समुपदेशानाचा लाभ न मिळालेल्या काही पालकांनी अवघ्या तीन महिन्याच्या अवधीमध्ये मुलांना परत संस्थामध्ये आणून दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालकांना समुपदेशन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१७) :**(१) होय.
(२) कारा (CARA) नवी दिल्ली यांनी दत्तकेच्छुक पालकांसाठी CARINGS या संकेतस्थळावर समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच टोल फ्री हेल्पलाईन सेवा क्रमांक १८००-११-१३११ असा आहे. विशेष दत्तक संस्थांमार्फतही पालकांना समुपदेशन केले जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यात शासकीय मध्यवर्ती रुग्णालयातील नागरीकांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(१९) ७७९३४ (१५-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यात शासकीय मध्यवर्ती रुग्णालयातील मशीनी बंद असून डॉक्टरांचाही अभाव असल्यामुळे स्थानिक नागरीकांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी रुग्णालय प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुनही त्याकडे रुग्णालय प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत व रुग्णालयातील बंद पडलेल्या मशीन्स व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) शासकीय मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथे महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा जिल्हा शल्य चिकीत्सक (गट-अ) संवर्गाची दोन्ही पदे भरण्यात आली आहेत व महाराष्ट्र आरोग्य सेवा (गट-अ) मधील वैद्यकीय अधिकारी (विशेषज्ञ) यांच्या १४ पदांपैकी ३ पदे भरण्यात आली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट अ ची २९ पदापैकी २६ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. शासकीय मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथील यंत्रसामुग्री उपकरणांची देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता कंत्राट देण्यात आले आहे. सदर रुग्णालयातील उपलब्ध असलेली यंत्रसामुग्री व उपकरणे सद्यस्थितीत सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात १८ हजार लोकांना कर्करोगाची लागण झाल्याबाबत**

**(२०) ७८४८४ (१९-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात रासायनिक औषधांची फवारणी, तंबाखूजन्य पदार्थांचा वापरामुळे १८ हजार लोकांना कर्करोग झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मिरजेच्या श्री सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटलमध्ये शिरोळ तालुक्यातील ८८०६ रुग्णांची गेल्या दोन वर्षात नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा कर्करोग रोखण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.शिरोळ तालुक्यातील सर्व रुग्णालयात सप्टेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ पर्यंत मिळून १८० संशयित कॅन्सर रुग्ण आढळून आले. त्यातील ५० रुग्ण कर्नाटक राज्यातील आहेत आणि शिरोळ तालुक्यातील ४५ संशयित रुग्ण आहेत. यातील ३७ रुग्ण मुख कर्करोग, ३ रुग्ण स्तनाचा कर्करोग व ५ रुग्ण गर्भाशय मुख कर्करोगाचे आढळून आले आहेत.
(२) हे खरे नाही.सन २०१५ व २०१६ या दोन वर्षात श्री.सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल मिरज येथे ७०९४ रुग्णांची नोंद असून त्यापैकी महाराष्ट्रातील ४८१८ रुग्ण आहेत. शिरोळ तालुक्यातील ३१९ विविध प्रकारच्या कर्करोग बाधित रुग्णांनी श्री.सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल, मिरज येथे उपचार घेतले आहेत.
(३) कोल्हापूर जिल्हयामध्ये संशयित कॅन्सर रुग्णांच्या तपासणीसाठी महिला आरोग्य अभियान, कर्करोग जन जागृती पंधरवडा राबविण्यात येतो. त्यामध्ये पुढीलप्रमाणे उपाययोजना केली जाते.

• या कार्यक्रमांतर्गत स्तन, गर्भाशय मुख मुख कॅन्सर ची तपासणी करण्यात येते.

• कर्करोग ग्रस्त रुग्णांसाठी राष्ट्रीय असंसर्गजन्य नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कॅन्सर वॉरियर हा नाविन्यपूर्ण प्रकल्प टाटा मेमोरिअल हॉस्पीटलच्या सहाय्याने राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत तज्ञ डॉक्टरांकडून बाहय रुग्ण सेवा व आंतररुग्ण सेवा जिल्हा रुग्णालयात देण्यात येते.

• आतापर्यंत एकुण १९३९ बाहय रुग्ण व २६७ आंतररुग्णांना कर्करुग्ण सेवा देण्यात आली आहे.

• महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कर्करोगावर विविध उपचार मोफत दिले जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात नातेवाईकांच्या अत्याचाराला बळी पडून**
**२१ मुली कुमारीमाता बनल्याबाबत**

**(२१) ७९४४७ (१९-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात मागील १२ महिन्यात जवळच्याच नातेवाईकांच्या अत्याचाराला बळी पडून २१ मुली कुमारीमाता बनल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे मागील वर्षभरात अनैतिक संबंधातून जन्माला आलेल्या २५ बाळांना त्यांच्या मातांनी अनाथालयाच्या स्वाधीन केले आहे, यात २१ कुमारीमाता, ११ परित्यक्त्या, विधवा मातेच्या बाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याशिवाय १४ अर्भकांना रस्त्यावर, कचराकुंडीत फेकून देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्हयात मागील १ वर्षाच्या कालावधीत ११ कुमारी माता, ०१ विधवा व ०१ परित्यक्त्या तसेच १५ बालके आढळून आलेली आहेत.

(३) बाल कल्याण समिती औरंगाबाद यांनी दिलेल्या माहितीनुसार जिल्हयामध्ये, औरंगाबाद जिल्हयातील एकूण १४ सापडलेली बालके पोलीसांमार्फत बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार शिशुगृहात दाखल झाली आहेत.

(४) औरंगाबाद जिल्हयात १४ सापडलेल्या बालकांच्या बाबतीत पोलीस विभागाने अज्ञात इसमाविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३१७ नुसार गुन्हा दाखल केला असून पोलीसांमार्फत चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन एक वर्षापासून बंद असल्याबाबत**

**(२२) ८०१४५ (१८-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन मागील एक वर्षापासून बंद असल्यामुळे रुग्णांना तपासणी करण्यासाठी बाहेर खासगी रुग्णालयात जादा खर्च करावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांची समस्या सोडविण्यासाठी सध्या बंद असलेली सिटीस्कॅन मशीन त्वरीत दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०९-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे.
जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील सि.टी. स्कॅन मशीन एक वर्षापासून बंद होती. तथापि गरीब व अत्यवस्थ रुग्णांना सि.टी.स्कॅन तपासणी करण्याकरीता हिंगोली येथील खाजगी सि.टी.स्कॅन सेंटर येथे तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था करण्यात आलेली होती व त्यासाठीच्या शुल्काची प्रतीपूर्ती जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील रुग्ण कल्याण समिती अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यात आली आहे.
(२) दि.२५.०५.२०१७ पासून जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील सि.टी.स्कॅन मशीन दुरुस्त करुन रुग्णसेवेकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील डायग्नोसिस सेंटर्स रुग्णांचे चुकीचे निदान करत असल्याबाबत**

**(२३) ८०८०७ (१९-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील डायग्नोसिस सेंटर्स रुग्णांचे चुकीचे निदान करुन तज्ञ डॉक्टरांची स्वाक्षरी नसतांना रिपोर्ट देत असल्याचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डायग्नोसिस सेंटर पुणे आरोग्य विभागाच्या अखत्यारित येत नसल्याने त्यांच्यावर पालिकेकडे नोंदणी करण्याचे बंधन नाही यामुळे याबाबत येणा-या तक्रारींचे प्रमाणही कमी आहे तसेच डायग्नोसिस सेंटरवर कायदयाचेही बंधन नसल्याने चुकीच्या निदानामुळे रुग्णांचे जीवन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करुन शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि. रायगड) तालुक्यातील रूग्णालयातील जैविक कचऱ्याबाबत**

**(२४)** *८१३८८* **(१५-०४-२०१७). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील कर्जत उपजिल्हा रूग्णालयात निर्माण होणारा कचरा संकलित करून विल्हेवाट लावण्यासाठी ठाणे जिल्हयात पाठविला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्जत उपजिल्हा रूग्णालयात गोळा होणारा कचरा हा दवाखान्याच्या आवारात असलेल्या शवविच्छेदनगृहाच्या बाजूला टाकून जाळण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रूग्णालय परिसरात राहणाऱ्या नागरिकांसह रूग्णालयातील रूग्णांना त्रास होत असून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. उपजिल्हा रुग्णालय, कर्जत, जिल्हा रायगड येथिल कच-याचे वर्गीकरण करुन पांढ-या रंगातील पिशव्यामधील कचरा नगर पालिकेकडे व बायोमेडिकल वेस्ट सी.टी.डी.एफ (Common Treatment Disposal Facility) पध्दतीने एका दिवसाआड कचरा घेऊन विल्हेवाट केली जाते. याचे रेकॉर्ड ठेवले जाते.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्यातील येऊशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील शस्त्रक्रिया गृह मागील पाच महिन्यापासून बंद असल्याबाबत**

**(२५) ८२०४८ (१५-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील येऊशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील शस्त्रक्रिया गृह मागील पाच महिन्यापासून बंद असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे तसेच या रुग्णालयाच्या इमारतीचा दोन ठिकाणी स्लॅब कोसळल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्राथमिक आरोग्य केद्रांची दुरुस्ती करुन येथील शस्त्रक्रियागृह कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०८-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

येऊशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मागील पाच महिन्यापासून शस्त्रक्रियागृह बंद आहे. परंतु येऊशी परिसरातील रुग्णांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, दहिफळ, ता.कळंब व शासकीय आयुर्वेदिक रुग्णालय, उस्मानाबाद येथे शस्त्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच रुग्णालयाच्या इमारतीचा स्लॅब कोसळलेला नसून इमारतीच्या छताचे प्लास्टर पडले आहे.

(२) कार्यकारी अभियंता (बां), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना जिल्हा परिषद आरोग्य विभाग, उस्मानाबाद या कार्यालयाचे पत्र क्र.१७४-७६, दि.२१.०१.२०१७ अन्वये दुरुस्तीचे अंदाजपत्रक सादर करण्यासाठी पत्र देण्यात आले आहे. अंदाजपत्रक प्राप्त होताच पडलेल्या छताचे प्लास्टर व रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला व बालविकास विभागांतर्गत बालसंगोपन योजना राज्यात राबविण्याबाबत**

**(२६) ८२५९६ (१८-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागांतर्गत बालसंगोपन योजना राज्यात राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे अनुदान अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील लाभार्थ्यांना सन २०१४-१५ पासून देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुदान तातडीने न दिल्यास लाभार्थ्यांसह आंदोलन करण्याचा इशारा सदर लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.महिला व बालविकास मंत्री यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१७)** :(१) होय.
(२) नाही.
(३) मा.श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू वि.स.स यांचे दि.१४ ऑक्टोबर, २०१६ चे निवेदन शासनास प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने शासनाने दि.३०.११.२०१६ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविलेली आहे.
(४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात बालसंगोपन योजनेसाठी रू.८.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय,अमरावती यांना रू.२०.९७ लक्ष अनुदान करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगरुळ-चव्हाळा (जि.अमरावती) सर्दी-तापाच्या उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झालेल्या दोन वर्षाच्या मुलीला कालबाहय औषधांचा डोस दिल्याबाबत**

**(२७) ८३२३० (१८-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरुळ-चव्हाळा (जि.अमरावती) सर्दी-तापाच्या उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झालेल्या दोन वर्षाच्या मुलीला कालबाहय औषधांचा डोस दिल्याने तिची प्रकृती बिघडली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कालबाहय औषधे तातडीने नष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०९-२०१७)** :(१) दिनांक ०९.०१.२०१७ रोजी वेनी गणेशपूर येथील ४ वर्षांची रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्दी व ताप आल्यामुळे उपचारासाठी आली होती. तिला कालबाह्य औषधाची बॉटल दिली गेली. मात्र सदर कालबाह्य बॉटल लागलीच परत घेतल्याने सदर औषधामुळे मुलीची प्रकृती बिघडलेली नाही.

(२) होय सदर प्रकरणाची चौकशी केली आहे.

(३) चौकशी अंती संबंधितांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

मुदतबाह्य झालेली सायरप इरिथ्रोमायसिन या औषधाची एक बॉटल प्रा. आ. केंद्रामध्ये होती. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये इतर कोणतीही औषधे कालबाह्य नसल्याची तालुका आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत खात्री करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील निराश्रित बालकांचे थकीत अनुदानाबाबत**

**(२८) ८४६४५ (१९-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराश्रित बालकांचे थकीत अनुदानाचे कारण सांगून बालकांना बालगृहात प्रवेश देऊ नका ह्या महिला व बालविकास विभागाच्या निर्णयामुळे ७० हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बालन्याय अधिनियम २०१५ च्या कलम २(१४) मध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना बालगृहात प्रवेश देण्याचे नमूद केले आहे, मात्र महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तांनी पोटकलम १ ते १२ च्या पलिकडे जाऊन अधिनियमाचा चुकीचा व सोयीचा अर्थ लावत बालगृहात फक्त अनाथ मुलांनाच प्रवेश देण्याचे आदेश द्यावेत असे निर्देश जिल्हास्तरीय बालकल्याण समित्यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही..

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये २९ वाघांची घट झाल्याबाबत**

**(२९) ८४८३५ (११-०८-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये गतवर्षी वन्यजीव गणनेत ९१ वाघ आढळले असतांना यावर्षी वन्य प्राण्यांच्या गणनेत ६२ वाघांचे दर्शन झाल्याने २९ वाघांची घट झाल्याचे दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीअंती २९ वाघांचा शोध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये २९ वाघांची घट झाल्याची दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील रामटेकडीवर वन विभागामार्फत वृक्ष लागवडीसाठी खड्डे खणत असतांना दहा ते पंधरा वर्षे जुनी असलेली झाडे मुळापासून उपटून बाजूला टाकल्याबाबत**

**(३०) ८४९५५ (२१-०८-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील रामटेकडीवर वन विभागामार्फत वृक्ष लागवडीसाठी खड्डे खणत असतांना दहा ते पंधरा वर्षे जुनी असलेली झाडे मुळापासून उपटून बाजूला टाकली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती झाडांची तोड करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.
ग्लिरीसिडीया या प्रजातींची एकूण ६ झाडे पुणे वनविभागाच्या मंजूर कार्यआयोजनेत नागरी वन व्यवस्थापन वृत्तातील क्षेत्रीय कामांसाठी दिलेल्या तरतुदी नुसार सदरची ६ झाडे काढण्यात आली आहेत.
(२) पुणे वनविभागाच्या मंजूर कार्यआयोजनेत नागरी वन व्यवस्थापन वृत्तातील क्षेत्रीय कामांसाठी असलेल्या तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यालगतच्या वस्त्यांमध्ये अस्वलांच्या वाढत्या हल्यांबाबत**

**(३१) ८५०९७ (११-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यालगतच्या वस्त्यांमध्ये अस्वलांच्या वाढत्या हल्ल्यांबाबत संशोधन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अभ्यासकाचा समावेश असलेली विशेष तज्ञांची समिती दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास नेमण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीच्या संशोधनात्मक अभ्यासाअंती काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, मानवी वस्त्यांवरील अस्वलांचे हल्ल्यांचा प्रतिबंध करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) व (२) बुलढाणा जिल्ह्याच्या मध्यभागी ज्ञानगंगा अभयारण्य आहे. अभयारण्याचे भौगोलिक क्षेत्र २०३.५६ चौ. कि.मी. इतके असून त्याची व्याप्ती बुलढाणा, मोताळा, खामगाव आणि चिखली या चार तालुक्यामध्ये आहे. सदर अभयारण्यामध्ये अस्वल या वन्यप्राण्यांचा नैसर्गिक अधिवास आहे. अभयारण्याच्या सिमेस लागुन असलेले क्षेत्र प्रामुख्याने शेतीखाली आहे. उक्त भौगोलिक स्थितीमुळे अभयारण्यास लागुन असलेल्या क्षेत्रात अस्वलाचे हल्ले होत असुन, अस्वलाच्या हल्ल्यात मनुष्य मृत व जखमीच्या घटना घडत असतात.

अस्वलांचे हल्ले रोखण्याच्या दृष्टीने कायम व दिर्घकालीन उपयांबाबत युथ फॉर नेचर कन्झरवेशन ऑर्गनाईझेशन, अमरावती (YNCO) यांचे तर्फे डॉ. स्वप्नील सोनोने, Wildlife Research and President YNCO व श्री. निशीथ धारिया, Chair Person INCN यांनी ज्ञानगंगा आणि लगतचे वनक्षेत्रात मानव - अस्वल संघर्षापासून बचावासाठी अभ्यास / संशोधन करण्याचा प्रस्ताव सादर केला असून त्यांचेशी दिनांक २९.०६.२०१७ रोजी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे.

सदर समिती आपला अहवाल एक वर्षात सादर करणार आहे.

(३) मानव -अस्वल या वन्यप्रण्यांचा संघर्ष होवू नये म्हणून खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- मानव - अस्वल संघर्ष प्रवण क्षेत्रात गस्तीपथकांची स्थापना करण्यात आली असून सदर पथकामार्फत मानव - अस्वल संघर्ष प्रवण क्षेत्रात नियमित गस्त घालण्यात येते.
- जलद कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे.
- ग्रामस्थामध्ये जनजागृती करण्यात येत आहे.
- गस्तीकरीता गावातील समितीचे सभासद यांचा समावेश करण्यात येतो.
- मानव वन्यप्राणी संघर्षाच्या अनुषंगाने स्थानिकांचे संरक्षणासाठी तीन महीन्याचा कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**चिपळूण (जि. रत्नागिरी) तालुक्यात रक्तचंदनाचा अवैद्य साठा जप्त केल्यानंतर संपूर्ण राज्यातील जप्त साठा एकत्रित करण्याबाबत**

**(३२) ८५३०१ (११-०८-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यात रक्तचंदनाचा अवैद्य साठा जप्त केल्यानंतर संपूर्ण राज्यातील जप्त साठा एकत्रित करण्याचे काम दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डायरेक्टर ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्सची मदत घेऊन आत्तापर्यंत राज्यात जप्त केलेल्या रक्तचंदन साठयाबाबत तस्करांनी केलेली कारवाई व त्याचे आंतरराष्ट्रीय बाजारातील मूल्य याबाबत डी.आर.आय.ने राज्य शासनाला दिलेल्या सूचनांबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार आत्तापर्यंत राज्य शासनाने, राज्यात ठिकठिकाणी वेळोवेळी घातलेल्या छाप्यात जप्त करण्यात आलेले रक्तचंदन लिलावाद्वारे विक्री करुन सदर रक्कम राज्य शासनाकडे जमा करण्याबाबत केंद्र शासनाकडे परवानगी मागण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही,

(२), (३) व (४) विदेशी व्यापार महासंचालनालय, भारत सरकार यांनी जप्त रक्तचंदनाच्या विल्हेवाटी बाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे, रक्तचंदनाच्या विक्री प्रक्रीयेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रक्तचंदनाची उच्चतम किंमत येण्याकरीता जागतीक पातळीवर निविदा मागवून त्याची विक्री करण्याकरीता शासन निर्णय दिनांक २१ मार्च, २०१७ अन्वये निवीदा मुल्यमापन समिती आणि रक्तचंदनाची विल्हेवाट करण्याकरीता आवश्यक निर्णय घेण्यासाठी निवीदा मंजूरी समिती अशा दोन समित्यांची स्थापना करण्यात आल्या आहेत.

---

**कोळम (ता.येवला, जि.नाशिक) खु. शिवारात काळविटाची बंदुकीच्या सहाय्याने शिकार केल्याबाबत**

**(३३) ८५४४१ (११-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळम (ता.येवला, जि.नाशिक) खु. शिवारात दिवसा काळविटाची (हरीणाची) बंदुकीच्या सहाय्याने शिकार करण्यात आली त्यातील एका शिकाऱ्यास ग्रामस्थांनी पकडून वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिल्याचे दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१), (२) व (३) येवला वनक्षेत्रामध्ये मौजे कोळम खुर्द गावाचे वनहद्दीत गट नं १२० मध्ये दिनांक १०.०६.२०१७ रोजी सायंकाळी ५ आरोपींनी बंदुकीचा सहाय्याने नर काळवीटाची शिकार केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर घटनेत श्री. दस्तगिर महंमद हारून अन्सारी रा. मालेगांव वय २४ वर्ष यांस स्थानीक ग्रामस्थांचे मदतीने अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयीन प्रक्रीया सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरेड कऱ्हांड (जि.नागपूर) येथील जय वाघापाठोपाठ टी १० म्हणजे श्रीनिवासन वाघ बेपत्ता झाल्याबाबत**

**(३४) ८५४४३ (२१-०८-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड कऱ्हांड (जि.नागपूर) येथील जय वाघापाठोपाठ टी १० म्हणजे श्रीनिवासन वाघ माहे एप्रिल, २०१७ पासून अचानक बेपत्ता झाला असल्याची धक्कादायक माहिति दिनांक ११ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टी-९ सुखरूप, टी-९ ऊर्फ बिटू हे ही वाघ माहे एप्रिल, २०१७ पासून बेपत्ता आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बेपत्ता वाघाचा शोध घेण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत येत असलेल्या उमरेड क-हांडला अभयारण्यातील जय वाघापाठोपाठ टी-१० श्रीनिवास हा वाघ दि.१९/४/२०१७ रोजी भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून यांचेकडून Mortality Report मध्ये डाटा स्थिर अवस्थेत असल्यामुळे ब्रम्हपुरी वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी, नागभीड हे टी-१० (श्रीनिवास) या वाघाच्या शोध मोहिम राबवत होते. या शोध मोहीमेत वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) पवनी हे व त्यांचा चमु देखील मदत करत

होता उमरेड - पवनी - क-हांडला अभयारण्य यांचे चमू शोध माहिमेंतर्गत टी-१० (श्रीनिवास) हा वाघ श्री.महादेव बाबुराव इरपाते, रा. कोथूर्णा, ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर यांचे शेतातमध्ये विद्युत करंट लावून असलेल्या तारेच्या कुंपणामध्ये मृत पावला व त्यांनी त्या वाघाला शेतात खड्डा खोदून दफन केल्याचे चौकशीवरुन निष्पन्न झाले.

(२) टी-९ उर्फ बिटू हा वाघ माहे एप्रिल २०१७ पासून बेपत्ता झाला हे खरे नाही.

(३) टी-९ बेपत्ता न झाल्यामुळे शोध घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ४ ठिकाणी तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय सुरू करण्याबाबत**

**(३५) ८५८७३ (११-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या सहकार्याने राज्यात ४ ठिकाणी तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय सुरू केले जाणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अत्याधुनिक रुग्णालयांसाठी राज्य शासनाकडून नाशिकसह अमरावती, नागपूर व लातूर या चार शहरांची नावे सुचविण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालये तातडीने सुरु होण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२१-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. शासनाने नाशिक, अमरावती, लातूर, नागपूर या शहरातील रुग्णालये निश्चित केली आहेत.

(३) राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅंसर हॉस्पीटल नागपूर; विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर लातूर; रिजनल रेफरंस हॉस्पीटल, नाशिक या तीन संस्थांचे प्रस्ताव केंद्र शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात आले असून, यापैकी राष्टसंत तुकडोजी रिजनल कॅंसर हॉस्पीटल नागपूर व विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर लातूर या संस्थांचे प्रस्ताव केंद्र शासनाने मंजूर केले आहेत. अन्य एक प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅंसर हॉस्पीटल नागपूर व विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर लातूर या संस्थांसाठी केंद्र शासनाने निधी मंजूर केला आहे. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती यांच्या प्रस्तावाची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयात १० लाख वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट सामाजिक वनीकर्णाच्या माध्यमातून पूर्ण करण्याबाबत**

**(३६) ८६०६८ (२१-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात यावर्षी १० लाख वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे जाहीर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे काम वन विभागाकडे देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत शासकीय, खासगी जमिनीत किती वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पूर्ण करण्यात आली आहेत,

(४) तसेच, वन विभागाकडून वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट अपूर्ण असल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण विभागास जिल्हास्तरावरुन रोप लागवडीचे २२,५७५ उद्दिष्ट देण्यात आले होते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) दि. ०१.०७.२०१७ ते ०७.०७.२०१७ या कालावधीत सामाजिक वनीकरण विभागाने २२,५७५ रोपांची वृक्ष लागवड पुर्ण केलेली असून देण्यात आलेले जिल्हा स्तरीय उददीष्ट पूर्ण केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागझिरा (जि.भंडारा) अभयारण्यातील "जय" नामक वाघाचा एक वर्षापासून शोध न लागल्याबाबत**

**(३७) ८६९६४ (११-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागझिरा (जि.भंडारा) अभयारण्यातील "जय" नामक वाघ दिनांक १८ एप्रिलला वर्ष पूर्ण होऊन सुध्दा अद्यापी त्याचा शोध वन विभागाला लागला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.वनेमंत्री यांनी "जय" सापडेल असे व्याघ्रप्रेमींना आश्वासीत केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "जय" वाघाचा अद्यापी शोध न लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७)** :(१) माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये १०० ते १२० किमी अंतर प्रवास करुन पेंच व्याघ्र प्रकल्पातर्गतील उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातील पवनी (वन्यजीव) वनपरिक्षेत्रात "जय" नामक वाघ निदर्शनास आला. सदर "जय" नामक वाघ हा नियमितपणे उपरेड-पवनी-कऱ्हाडला अभयारण्याच्या एकूण क्षेत्र १८९.२९ चौ.किमी मधील उमरेड (वन्यजीव), कुही (वन्यजीव) दोन्ही जि.नागपूर व पवनी (वन्यजीव ) परिक्षेत्र जि. भंडारा या भागात माहे एप्रिल, २०१६ पर्यंत फिरत होता.

उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात नियमित वाघाचा मागोवा घेत असून माहे ऑगस्ट, २०१७ पर्यत UKT-१ "जय" नामक वाघाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कोणत्याही स्वरुपाचे पुरावे निदर्शनास आलेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) माहे जुलै, २०१६ मध्ये UKT-१ "जय" नामक वाघाच्या शोध मोहिमेसाठी पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत ०६ चमु तयार करण्यात आले.

विभागीय स्तरावर गठीत चमुमध्ये स्थानिक स्वयंसेवी संस्था, मानद वन्यजीव रक्षक व स्थानिय लोकांचा समावेश करुन पवनी (वन्यजीव) वनपरिक्षेत्र, पवनी (प्रादेशिक) वनपरिक्षेत्र तसेच ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरीचे नागभीड वनपरिक्षेत्र व खडसंगी, चिमुर या भागात शोध मोहिम राबविण्यात आली.

पुरकाबोडी, रावणवाडी, भंडारा वनविभाग भंडाराचे अधिनस्त क्षेत्रामध्ये मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर आणि उपवनसंरक्षक, भंडारा वन विभाग, भंडारा यांचे समक्ष सामुहिक शोध मोहीम राबविण्यात आली.

शोध मोहीमेच्य अंती UKT-१ "जय" नामक वाघाचा उपस्थिती किंवा अनुपस्थिती बाबत स्पष्ट पुरावे प्राप्त झाले नाही.

UKT-१ "जय" नामक वाघ हा उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात तीन वाघिणीच्या सहवासात असल्यामुळे सातत्याने तिन्ही वाघीणीला ०९ छावे जन्माला आल्यामुळे व कालांतराने ते वयस्क होत असल्यामुळे आपले अधिकार क्षेत्र निश्चित करण्याचे दृष्टीकोनातुन नवीन क्षेत्राची निवड करण्यासाठी सुध्दा बाहेर जाऊ शकतो. याबाबतची शक्यता नाकारता येत नाही, असे भारतीय वन्यजीव संस्था, देहरादुन (WII) यांचे मत आहे.

---

## भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील जंगलात वणवा लागल्यामुळे वनसंपदा धोक्यात आल्याबाबत

**(३८) ८७३४१ (११-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील जंगलात वारंवार वणवा लागल्यामुळे वनसंपदा धोक्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जंगलात आगीचे होणारे प्रकार थांबविण्यासाठी वन विभागाकडून माळाच्या चहुबाजूंनी विशेष जाळरेषेची आखणी केली जात असून त्यासाठी निधीची सोयही केली जाते, परंतु ही कामे नाममात्र केल्याने वणव्याचे प्रमाण थांबत नसल्याने शासनाचा निधी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील आगीस व वणव्यास कारणीभूत असलेल्यावर शासनाकडून कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) जंगलात आगीचे होणारे प्रकार थांबविण्यासाठी वन विभागाकडून कार्य आयोजना नुसार दरवर्षी माळाच्या चोहोबाजुनी विशेष जाळरेषेची आखणी केली जाते, तसेच सदर जाळरेषा घेण्याचे काम या वनविभागामार्फत तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात आलेले आहेत. शासनाकडून मिळालेल्या निधीमधून जाळरेषा पुर्ण करण्यात आलेली आहे. याप्रकरणी शासनाचा निधी वाया गेलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यात तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या सहा जणांवर अस्वलाने हल्ला केल्याबाबत**

**(३९) ८८३५९ (११-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड (जि.चंद्रपूर) तालुक्यात तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेलेल्या सहा जणांवर अस्वलाने हल्ला केल्यान त्यात तीन जणांचा मृत्यु झाल्याचे दिनांक १४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू विभागात जंगली श्वापदाचे नागरिकांवर हल्ले होत असल्याने यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.
दिनांक १३.०५.२०१७ रोजी ब्रम्हपूरी वन विभागातील तळोधी परिक्षेत्रातील आलेवाही नियतक्षेत्रात तेंदूपत्ता गोळा करण्याकरीता गेलेल्या तीन व्यक्तीना अस्वलाने हल्ला करुन ठार केले व तीन व्यक्तींना जखमी केलेल्याची घटना निदर्शनास आले आहे.
(२) उपरोक्त वनक्षेत्रात मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपायोजना करण्यात आलेल्या आहेत.

- कॉरिडोअर विकास कार्यक्रमांतर्गत TRACT या अशासकीय संस्थेद्वारे गावामध्ये प्रशिक्षण घेऊन मानव - वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने गावकरी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी वनक्षेत्रात कृत्रिम पाणवठे, वनतळी, वन बंधाऱ्याची निर्मिती करण्यात येऊन त्यात पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.
- मानव - वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी वनकर्मचारी / अधिकारी यांना वन्यप्राण्यांना बेशुध्द (Tranquilize) करण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.
• परिक्षेत्रस्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.
• नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालीचे संनियंत्रण करण्यात येते.
• ग्रामीण भागात विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते.
• वन्यप्राण्यांचे होणारे संभाव्य हल्यापासून योग्य ती खबरदारी घेणे व जंगलात न जाण्याबाबत सावधानातेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावणेत आले आहेत.
• वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास, संबंधित जखमी व्यक्तीस प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
• आवश्यकता भासल्यास वन्यजीव संरक्षण (अधिनियम), १९७२ च्या नियमांतील तरतूदीच्या अनुषंगाने उपद्रवग्रस्त वन्यप्राण्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील मारेगाव वनपरिक्षेत्रातील मौजे दापोरा देवस्थान भागातील १५ सागवान झाडांची तोड वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी केल्याबाबत**

**(४०)** *८८६५९* **(१८-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील मारेगाव वनपरिक्षेत्रातील मौजे दापोरा देवस्थान भागातील १५ सागवान झाडांची तोड तेथेच कार्यरत असलेले वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी केल्यामुळे याबाबतची तक्रार करणुजी कुडमते यांनी उपवन संरक्षक अधिकारी, पांढरकवडा यांना दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीस १ वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता तक्रारीत नमूद वनरक्षकाने वरिष्ठांचे निर्देशानुसार कार्यवाही केली असल्याचे निदर्शनास आले असल्याने संबंधित वनरक्षकाविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदरील वृक्षतोड कार्य आयोजनेप्रमाणे केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेनुसार हवा धुंदीने/ वादळाने जमिनीवर पडलेले साग वृक्षांची रितसर परवानगीने कटाई करण्यात आलेली आहे.

---

**शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील खुंदलापूर या गावाचे स्थलांतर यदगाव (ता.कडेगाव) येथील वन जमिनीवर करणेबाबत**

**(४१) ८८८१७ (११-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुंदलापूर (ता.शिराळा, जि.सांगली) येथील गावांचे सहयाद्री व्याघ्र प्रकल्पांतर्गत स्थलांतर अद्याप झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाचे स्थलांतर करुन यदगाव (ता.कडेगाव) या ठिकाणच्या वन जमिनीमध्ये पुनर्वसन करण्याचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खुंदलापूर गावच्या नागरिकांनी यदगाव येथील जमिन त्यांच्या पुनर्वसनासाठी पसंत केली असतानाही सदर गावची वन जमिन डी फॉरेस्ट करण्याकरिता वन विभागाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावातील पुनर्वसन करण्याकरिता सन १९९५ च्या दरम्यान प्रत्येक कुटुंबातील नागरिकांची संख्या गृहीत धरुन संकलन रजिस्टर करण्यात आले असल्याने सन १९९५ मध्ये १८ वर्षापेक्षा कमी वय असणारे नागरिक तसेच, सन १९९५ च्या दरम्यान जन्म झालेल्या नागरिकांचे वय २० ते ३५ वर्षापेक्षा अधिक असल्याने या नागरिकांचा कुटुंब प्रमुख म्हणून समावेश सुधारित संकलन रजिस्टर तयार करण्याचे शासनाचे धोरण आहे काय,

(५) असल्यास, त्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

मौजे खुदलापूर येथील एकूण ७२ खातेदारांपैकी ४४ खातेदारांनी त्यांचे पुनर्वसनासाठी मौजे येतगाव, ता.कडेगाव येथील वनजमीन व ०९ खातेदारांनी मौजे बिऊर, ता. शिराळा येथील वनजमीन पसंत केली आहे. उर्वरित खातेदारांनी त्यांचे पुनर्वसन वरील दोन्ही गावात न करता नव्याने वनजमीन दाखवून त्यांचे पसंती नुसार करण्याबाबत ठराव दिला आहे.

(३) हे खरे नाही. मौजे खुदलापूर येथील ग्रामस्थांनी पुनर्वसनासाठी पसंत केलेल्या येतगाव येथील वनजमीनीचा निर्वणीकरण प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही उपवनसंरक्षक सांगली यांचेकडून चालू आहे.

(४) संरक्षित क्षेत्र म्हणजेच अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान इत्यादीतून स्थलांतरीत होणाऱ्या गावातील कुटुंब म्हणजे व्यक्ती, नवरा-बायको (Spouse) त्याचा / तिचा अज्ञान (minor), मुलगा / मुलगी, अज्ञान भाऊ, अविवाहीत बहिण, आई-वडील, त्या व्यक्तिवर उदरनिर्वाह व उपजीविकेसाठी अवलंबून असलेले आणि सोबत वास्तव्य करीत असलेले इतर नातेवाईक, १८ वर्षावरील सज्ञान मुलगा / १८ वर्षावरील सज्ञान अविविहित मुलगी एक स्वतंत्र कुटुंब समजण्यात येईल. महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम ११ अन्वये ज्या तारखेला अधिसूचना जाहिर करण्यात येईल त्या दिवशी अतित्वात असलेले कुटुंबांची संख्या ही अंतिम समजण्यात येईल, असे शासनाचे धोरण आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील अंभई परिसरात बिबटयानी गोठयात शिरुन एका शेळीचा बळी घेतल्याबाबत

**(४२) ८८८४८ (११-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील अंभई परिसरात बिबटयानी एका गोठयात शिरुन एका शेळीचा बळी घेतला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितांना नुकसान भरपाई देण्यासोबतच येथील शेतकऱ्यांचे अधिक नुकसान होवू नये यासाठी सदर बिबटयाला जेरबंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०१.०५.२०१७ रोजी मौजे जंजाळा येथील श्री. कासम खॉ काले खॉ यांचे गोठ्यातील शेळीवर हल्ला करुन बळी घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) प्रचलित शासन निर्णयान्वये पशुधन नुकसान प्रकरणी संबंधितास नुकसान भपरपाई अदा करण्यात आली आहे.

सदर हल्ला हा भक्ष्यासाठी केल्याचे निदर्शनास आले असून सदर बिबट नरभक्षक झाल्याचे लक्षण दिसून आलेले नाही. त्यामुळे सदर बिबट्यास जेरबंद करण्याची कार्यवाही केलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील सन १९९५ पूर्वीच्या घरांना पर्यायी घरे देण्याबाबत

**(४३) ८९४८८ (१६-०८-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील सन १९९५ पूर्वीच्या घरांना पर्यायी घरे देऊन ज्यांचे ७ हजार रुपये भरणा करावयाचे राहिले त्यांना एक संधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वारंवार मा.वने मंत्री यांना मा.पर्यावरण मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विनंतीवरुन शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा. वने मंत्री यांनी अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेतला नाही यांची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) या संदर्भात मा.मंत्री वने यांचे अध्यक्षतेखाली दि. २३/१/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि, या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.८३/२००८ व ८४/२००८ व नोटीस ऑफ मोशन क्र. ३४८/२०१० मा. उच्च न्यायालयाने फेटाळले आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली विशेष विनंती याचिका क्र. २२२३८/२०१२ मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

(३) मुदत वाढवून देणेकामी मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष विनंती याचिका २२२३८/२०१२ मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे विभागाने रक्कम रु. ७०००/- भरणेसाठी मुदतवाढ देणे कायदेशीर नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर डहाणू उपजिल्हा रुग्णालयाचे ट्रामा केअर सेंटर विनावापर पडून असल्याबाबत

**(४४) ८९६३१ (१२-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि. पालघर) तालुक्यात शासनाने सुमारे ५४ लाख रुपये खर्च करुन बांधलेली ट्रामा सेंटर इमारत बांधून एक वर्षाचा कालावधी उलटून वापराविना पडून असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील वर्षभरापासून उपजिल्हा रुग्णालय डहाणू तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग (पालघर) यांना ट्रामा केअर सेंटरचे हस्तांतरण करण्याबाबत असंख्य स्मरणपत्रे दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे ट्रामा केअर सेंटर तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२०-०९-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे. सदर ट्रॉमा केअर सेंटरसाठी लागणारा ३ फेज वीज पुरवठा,पाणी पुरवठा यांच्या सोयी करणे बाकी आहे. तसेच डहाणू नगरपरिषदेचे भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy certificate) अद्याप प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदर इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप विभागास हस्तांतरीत करण्यात आलेली नाही. याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४५) ९०११४ (११-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने राज्यात सुरु असलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन या प्रकरणात दोषींबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यात संरक्षित सिंचनाची व्यवस्था मोठया प्रमाणावर वाढविण्यासाठी कालबध्द नियोजन जल आराखडा तयार करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२१-०९-२०१७) :**(१) नाही.

जलयुक्त शिवार अभियानातंर्गत दापोली खेड व मंडणगड या तालुक्यामध्ये सन २०१५-१६मध्ये ४७ गावामध्ये एकूण रक्कम रुपये ३८९९.८८ लाखाची १६२७ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यापैकी रक्कम रुपये ३१५०.७७ लाखाची १६१३ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. व २०१६ -१७ मध्ये एकूण २७ गावामध्ये रक्कम रुपये २१८८.१२ लाखाची ७५३ कामे प्रस्तावित करण्यात आली होती . त्यापैकी रक्कम रुपये ५९६.३२ लाखाची ४३९ कामे पूर्ण झाली आहेत. म्हणजेच रत्नागिरी जिल्हयामध्ये एकूण ७४ प्रस्तावित रक्कम रुपये ६०८८.०० लाखाची २३८० कामापैकी रु. ३७४७.०९ लाख इतक्या रक्कमेची एकूण २०५२ कामे पूर्ण झाली आहेत.

(२) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे मार्फत समिती नेमण्यात येऊन प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार, तत्का.कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक यांच्याविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ४ (१)(अ) मधील तरतूदीनुसार निलंबनाची कारवाई विभागीय कृषि सहसचांलक कोकण विभाग,ठाणे यांचेमार्फत करण्यात आली आहे. तसेच कृषि विभागाने संबंधित तालुका कृषि अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी यांना त्यांच्या दि. २/८/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे. तसेच संबंधिताविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही एकत्रित प्रस्ताव मागविण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणाची विभागीय दक्षता पथकामार्फत स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, पोलिस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांचेमार्फतही चौकशी करण्यात येत आहे.

(३) एकात्मिक राज्य जल आराखडा माहे डिसेंबर २०१७ पर्यंत तयार करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना) परिसरात अवैध वृक्षतोड सुरू असल्याबाबत**

**(४६) ९१५६९ (१६-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना) परिसरात अवैध वृक्षतोड सुरू असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वृक्षतोडीमध्ये लिंब, बाभळ, बांबू झाडांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना), परिसरातील वनक्षेत्रात तसेच खाजगी क्षेत्रात अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे माहे मे-२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले नाही.

(२) भोकरदन बिटातील आन्वा परिसरातील वनक्षेत्रात व खाजगी क्षेत्रात लिंबू, बाभूळ, बांबू या झाडांची तोड माहे मे- २०१७ मध्ये वा त्या दरम्यान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेळघाट व्याघ्र प्रकल्पात एकूण ११३ गावे बफर झोन मध्ये असून २२ गावे अतिसंरक्षित (कोअर) क्षेत्रात येत असल्याबाबत**

**(४७) ९१६७८ (१६-०८-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पात एकूण ११३ गावे बफर झोन मध्ये असून २२ गावे अतिसंरक्षित (कोअर) क्षेत्रात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघांचे संरक्षण संवर्धन आणि त्यांना मुक्तसंचार करता यावा यासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ३७ गावांचा पुर्नवर्सनाचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावांचे पुर्नवसनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे बफर झोन मध्ये एकुण ११८ गावे असुन, अतिसंरक्षीत क्षेत्रात एकुण ३३ गावांचा समावेश होता, त्यापैकी १६ गावांचे पुनर्वसन झाल्यामुळे कोअर क्षेत्रामध्ये १७ गावे अस्तित्वात आहे.

(२) कोअर क्षेत्र मानवी हस्तक्षेप विरहीत व्हावे, व वाघांचे संरक्षण आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावे यासाठी ३३ गावांपैकी १६ गावांचे पुनर्वसन यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आलेल आहे. पुनर्वसन प्रक्रिया ही ऐच्छिक असुन गावाचे पुनर्वसनाबाबत ग्रामसभेचे ठराव आल्यानंतर पुनर्वसन प्रक्रियेस प्रारंभ होतो. सदर परिस्थितीत ६ गावांचे पुनर्वसनाचे ठराव प्राप्त झाले आहे.
(३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ६ गावे पुनर्वसनासाठी प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सदर ६ गावांचे पुनर्वसन प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोमेंडी गावात वन विभागाच्या परवानगीशिवाय शिवण, जांभूळ, ऐन तसेच अनेक झाडे तोडण्यात आल्याबाबत**

**(४८) ९२०२२ (१६-०८-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोमेंडी गावात वन विभागाच्या परवानगीशिवाय शिवण, जांभूळ, ऐन तसेच अनेक झाडे तोडण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लाकूड तोडीकडे वन विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे पर्यावरणाचा नाश होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीनुसार सदरहू वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०९-२०१७)** :(१) पोमेंडी या गावात जांभूळ, ऐन, या मनाई वृक्ष प्रजातीची झाडे वन विभागाचे परवानगी शिवाय तोडणेत आलेचे निदर्शनास आलेले नाही.

मौजे पोमेंडी ता.गुहागर या गावात अनुसूचित जातीच्या ऐन, किंजळ, आंबा, बिवळा अश्या एकुण ७९ झाडाचे तोडीसाठी वृक्ष अधिकारी तथा परिक्षेत्र वन अधिकारी, चिपळूण यांनी दिनांक ९.६.२०१६ अन्वये परवानगी दिली आहे. उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांनी दिनांक ३०.५.२०१६ अन्वये बिगर अनुसूचित प्रजातीच्या शेवर, शिवण, आकेशा, मोहट, चिरुळ, धामण, आसानी, कुंभा, बोराटी, भेला, कोंबडा अशा एकूण २०० बिगर मनाई झाडांचे तोडीस परवानगी दिली आहे.
(२) हे खरे नाही
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील वनक्षेत्रात एकही वनतळयाचे काम झाले नसल्याबाबत**

**(४९) ९२४१८ (१८-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील वनखंडाचे (कंपार्टमेंट) १९३ ते १९७ हे वनक्षेत्र १० हजार हेक्टर असून त्यातील चार मातीची धरणे, २० सिमेंट बंधारे जलस्त्रोत कोरडे पडल्याने वन्यजीव तहान भागविण्यासाठी १० कि.मी. अंतर पार अडावद, खर्डी, बर्डी, धनोरा या नागरी वसाहतीमध्ये जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील वनक्षेत्रात एकही वनतळयाचे काम झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पाण्याचा दीर्घकाळ संचय होईल अशा उपाययोजना करण्याची आवश्यकता असून याबाबत शासन कार्यवाही करणार काय,

(४) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील वनखंडाचे कं.न.१९३ ते १९७ हे वनक्षेत्र १० हजार हेक्टर नसून १५६४.२० हे. इतके आहे. सदर क्षेत्रात चार मातीचे आणि २० सिमेंट बंधारे आहेत. जलस्त्रोत कोरडे पडल्याने वन्यजीव तहान भागविण्यासाठी अडावद, खर्डी, बर्डी, धानोरा या नागरी वस्तींमध्ये येत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) चोपडा तालुक्या मध्ये देवझिरी, कर्जाणा, वैजापूर आणि चोपडा या ४ वनक्षेत्रांचा समावेश असुन या तालुक्यात २०१६-१७ मध्ये वनतळे घेण्यात आले नाही. परंतु ४१ सिमेंट बंधा-यांचे कामे जलयुक्त शिवार कार्यक्रम अंतर्गत करण्यात आलेली आहेत.

(३) सन २०१७-१८ मध्ये चोपडा तालुक्यातील वनालगतचे १० गावे ही जलयुक्त शिवार कार्यक्रमामध्ये असुन त्यांचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.

(४) सन २०१७-१८ मध्ये चोपडा तालुक्यातील वनालगतचे १० गावे ही जलयुक्त शिवार कार्यक्रमा मध्ये असुन त्यांचे आराखडे तयार करण्याचे काम सुरू असून त्याप्रमाणे वनबंधारे, सिमेंट बांधाची कामे घेण्यात येतील.

---

**गडचिरोली जिल्हयातील टसर कोसा उत्पादक शेतकऱ्यांना वन शेतीचे पट्टे देणेबाबत**

**(५०) ९४१९९ (२१-०८-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील १२ तालुक्यात टसर कोसा उत्पादक शेतकरी परंपरेने सुमारे १०० वर्षापासून टसर कोसा उत्पादन घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या वनक्षेत्रावर ते कोसा उत्पादन घेतले आहे ती जमीन व जंगल जतन करण्यासाठी गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्य अतिक्रमण धारकांना पट्टे मिळायला लागल्याने अन्य लोक जबरदस्तीने त्यांच्याकडून कोसा शेतीचे उत्पादन घेत असून त्यांच्यावर अन्याय होवून ते निराधार व बेरोजगार होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार शेतकऱ्यांना वन जमिनीचे पट्टे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०९-२०१७)** :(१) व (२) गडचिरोली जिल्ह्यात प्रामुख्याने वडसा वनविभागातील आरमोरी व देलनवाडी वनपरिक्षेत्रामध्ये रेशीम लागवड करण्यात येते.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कोसा उत्पादनाकरीता वनजमीन पट्ट्याने देता येत नाही. तथापि, वनक्षेत्राच्या परिसरातील आदिवासी व बिगर आदिवासींना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी टसर रेशीम रोपांची लागवड करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. शासनाने त्यानुषंगाने दिनांक २४.०६.२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये सुमारे १९७१ हेक्टर क्षेत्रावर कोसा लागवड करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.